लोकमत

# नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी गरजेची

## चर्चासत्रातील सूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्र सरकारचे नवे शैक्षणिक धोरण हे सर्वसमावेशक आहे. त्यात सर्व स्तरांवरील शिक्षणाचा साकल्याने विचार केला आहे. त्याची अंमलबजावणी तितक्याच प्रभावीपणे झाल्यास निर्धारित शैक्षणिक उद्दिष्टे गाठणे शक्य होईल, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष चर्चासत्रात उमटला.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ व महाविद्यालय विकास विभागातर्फे शुक्रवारी (दि. २८) 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर विशेष चर्चासत्र घेतले. त्यामध्ये संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, विद्यापीठाच्या इनोव्हेशन व इन्क्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. डॉ. हिर्डेकर म्हणाले, कोठारी आयोगाचा १०+२+३+२ हा पॅटर्न ५० वर्षे व्यवस्थित, यशस्वीपणे चालला. आता तो ५+३+३+४ असा बदलला आहे. सर्वांगीण विकासाभिमुख अशी त्याची निर्मिती केली आहे.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने आयोजित विशेष चर्चासत्रात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून पी. एस. पाटील, विलास नांदवडेकर, डी. टी. शिर्के, बी. एम. हिर्डेकर, आर. के. कामत उपस्थित होते.

### मसुदा समजून घेणे आवश्यक

प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिक्षणक्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्वच घटकांनी नव्या शैक्षणिक धोरणाचा संपूर्ण मसुदा शब्दनिहाय समजून घेणे आवश्यक आहे. त्यातील कित्येक बाबी अगदी आजही प्रचलित असणाऱ्या व्यवस्थेमध्ये अंगीकृत करणे, अमलात आणणे सहजशक्य आहे.

डॉ. पाटील म्हणाले, उच्च शिक्षणाची पुनर्रचना आणि नवनिर्माण असे दुहेरी उद्दिष्ट नवे शैक्षणिक धोरण बाळगून आहे. बुद्धिमान, सशक्त नैतिक मूल्याधारित व्यक्तिमत्त्वाची माणसे घडविली जावीत, अशी अपेक्षा धोरणात आहे. डॉ. कामत म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणात एकविसाव्या शतकाची कौशल्ये शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना देण्याची योजना महत्त्वाची आहे. चर्चासत्रात माजी आमदार भगवानराव साळुंखे, डॉ. भालबा विभूते, पी. एस. कांबळे, नीलेश बनसोडे, मेघा पानसरे, आदींनी सहभाग घेतला. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक, टी. एस. भूतकर यांनी सूत्रसंचालन, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

# शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी हवी

## शिवाजी विद्यापीठातील विशेष चर्चासत्रातील सूर

**कोल्हापूर, ता. ३० : केंद्र सरकारने नवे शैक्षणिक धोरण हे सर्वसमावेशक आहे. त्यात सर्व स्तरांवरील शिक्षणाचा साकल्याने विचार केला आहे. त्याची अंमलबजावणी तितक्याच प्रभावीपणे झाल्यास निर्धारित शैक्षणिक उद्दिष्टे गाठणे शक्य होईल, असा सूर शिवाजी विद्यापीठात झालेल्या विशेष चर्चासत्रात व्यक्त झाला. विद्यापीठ व महाविद्यालय विकास विभागातर्फे नवीन शैक्षणिक धोरण या विषयावर विशेष चर्चासत्र झाले. प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.**




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विशेष चर्चासत्रात बोलताना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. बी. एम. हिर्डेकर आदी.**

संजय घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर म्हणाले, ''शालेय शिक्षणात अभ्यासक्रमाचा बोजा कमी करून सर्वंकष कौशल्य विकासावर दिलेला भर महत्त्वाचा आहे, कोठारी आयोगाचा पॅटर्न व्यवस्थित आणि यशस्वीपणे चालला. आता त्यात बदल केले. सर्वांगीण विकासाभिमुख अशी त्याची निर्मिती केली आहे. बालकांच्या भरणपोषणाबरोबरच शिक्षण प्रक्रियेला दिलेले महत्त्व नोंद घेण्यासारखे आहे.''

डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, ''बारावीपर्यंतचे सर्व शिक्षण मोफत, सक्तीचे आणि देशभरात एकजिनसी, एकाच पॅटर्नचे करण्याचे महत्त्वाचे काम नव्या शैक्षणिक धोरणाने साध्य होणार आहे. उच्चशिक्षणाची पुनर्रचना आणि नवनिर्माण असे दुहेरी उद्दिष्ट धोरण बाळगून आहे. जागतिक दर्जाच्या बहुविद्याशाखीय शिक्षण संस्थांची निर्मिती करून त्या माध्यमातून ग्रॉस एन्रॉलमेंट रेशो (जीआआर) टक्क्यांच्या घरात नेण्याचे उद्दिष्टही आहे. बुद्धिमान, सेवाव्रती आणि सशक्त नैतिक मूल्याधारित संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची माणसे घडविली जावीत, अशी अपेक्षा धोरणात आहे.

डॉ. आर. के. कामत म्हणाले, ''नव्या शैक्षणिक धोरणात एकविसाव्या शतकाची कौशल्ये शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना देण्याची योजना महत्त्वाची आहे. त्यासाठी आंतरविद्याशाखीय व बहुविद्याशाखीय शिक्षणपद्धतीचा अंगीकार ही क्रांतिकारी बाब आहे.'' चर्चेत माजी आमदार भगवानराव साळुंखे, डॉ. भालबा विभूते, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. नीलेश बनसोडे, डॉ. मेघा पानसरे आदींनी सहभाग घेतला. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत केले, तर श्रीमती टी. एस. भुतकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.